कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील कोळीवाड्यांचे सर्वेक्षण व सीमांकन करण्याबाबत कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी समिती गठीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : विसआ-२०२०/प्र.क्र.२९९/भूमापन**
पहिला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २९ जानेवारी २०२६.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्याला सुमारे ७२० किलोमीटर लांबीची किनारपट्टी लाभलेली आहे. सदर किनारपट्टीलगत पिढ्यानपिढ्या अनेक कोळीवाडे अस्तित्वात असून तेथील कोळीबांधव परंपरागत मासेमारी व्यवसाय करतात.

कोळीवाड्यांच्या सीमांची गावठाणांप्रमाणे भूमि अभिलेख दप्तरी नोंदी नाहीत. त्यामुळे कोळीवाड्यांच्या सीमा भूमि अभिलेख दप्तरी नोंद करण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही अनुसरावी लागणार आहे. यासंदर्भात कोकण विभागातील मुंबई शहर व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरित ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील कोळीवाड्यांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करुन सीमांकन करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती निश्चित करण्यासाठी समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

कोकण विभागातील मुंबई शहर व मुंबई उपनगर हे २ जिल्हे वगळता उर्वरित ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील कोळीवाड्यांचे प्रत्यक्ष सर्वेक्षण करुन सीमांकन करण्यासाठी अनुसरावयाची कार्यपध्दती व तत्संबंधीची मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे:

| अ.क्र. | पदनाम | समितीतील पद |
|---|---|---|
| १. | विभागीय आयुक्त, कोकण विभाग | अध्यक्ष |
| २. | जिल्हाधिकारी, ठाणे | सदस्य |
| ३. | जिल्हाधिकारी, पालघर | सदस्य |
| ४. | जिल्हाधिकारी, रायगड | सदस्य |
| ५. | जिल्हाधिकारी, रत्नागिरी | सदस्य |
| ६. | जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग | सदस्य |
| ७. | सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ८. | उप संचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश | सदस्य |
| ९. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष | सदस्य |
| १०. | मुख्य बंदर अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई | सदस्य |
| ११. | प्रादेशिक उपायुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग, मुंबई | सदस्य |
| १२. | सदस्य सचिव, महाराष्ट्र किनारी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण, मुंबई (MCZMA) | सदस्य |
| १३. | अपर आयुक्त (महसूल) कोकण विभाग | सदस्य सचिव |

२. **समितीची कार्यकक्षा:**

१) कोकण किनारपट्टी क्षेत्रातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या ५ जिल्ह्यांतील कोळीवाडे असणाऱ्या गावांची तालुकानिहाय यादी तयार करणे, समुद्राच्या भरतीची उच्चतम सीमारेषा, मेरीटाईम बोर्डाकडील सीमारेषा तसेच कांदळवनांची सीमारेषा निश्चिती करणेकरीता जिल्हास्तरीय समितीचे गठन करणे.

२) उक्त ५ जिल्ह्यांतील कोळीवाड्यांचे सीमांकन करण्याची कार्यपध्दती निश्चित करणे व त्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे.

३) सर्वेक्षण व सीमांकन करण्याच्या कार्यपध्दतीनुसार संबंधित जिल्हाधिकारी यांना तसे कामकाज होण्याकामी आवश्यक ते मार्गदर्शन करणे व त्याबाबत कालबध्द कार्यक्रम निश्चित करणे.

३. सदर समितीने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ व सीमा निश्चिती, गावठाण घोषित करणे इ. अनुषंगिक नियम/धोरणे इ. बाबींचा अभ्यास करुन समितीचा अहवाल ०३ महिन्यांच्या मुदतीमध्ये शासनास सादर करावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०१२९१३४२५८१५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=C8A7D6860FF227FD9E69A02E9CA5DFB2CCB25EDA92D749629970F349FC6ED260, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C5917E56B0DA516AB259D846D516CB0584DCE5E9A2E73C0A35FA47BAB64E88AA, cn=SANJAY RAGHUNATH BANKAR
Date: 2026.01.29 13:44:33 +05'30'

**(संजय बनकर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रत.**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/ विधानसभा, विधानभवन, मुंबई
३. सर्व विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य

४. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
५. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७. मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१०. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
११.अपर मुख्य सचिव (बंदरे व परीवहन) यांचे स्वीय सहायक.
१२.जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१३.उपाध्यक्ष, महाराष्ट्र सागरी मंडळ.
१४.विभागीय आयुक्त, कोकण विभाग.
१५. जिल्हाधिकारी, ठाणे.
१६. जिल्हाधिकारी, पालघर.
१७.जिल्हाधिकारी, रायगड.
१८. जिल्हाधिकारी, रत्नागिरी.
१९. जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग.
२०. सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग.
२१.निवडनस्ती (कार्यासन भूमापन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.